# उंची

त्या बिल्डींगचा पत्ता काढत काढत मी शेवटी तिच्या पायथ्याशी येऊन पोहोचलो. तिची उंची पाहून मला भोवळ आल्यासारखं वाटलं क्षणभर! बापरे ! वीस मजले ! मनावर भार पडला. वीस मजल्याखाली ते दबलं....

पाय ओढत, एका हातातली पिशवी दुसऱ्या हातात घेत मी तळमजल्यावर निघालो. पण....

तिथे तळमजलाच नव्हता !

'व्ही' आकाराच्या स्तंभावर ती जमिनीपासून अलगद वर उभी होती. पहिला मजला अन् जमीन यात एक मजल्याचं अंतर होतं. मध्ये एक पोकळी! जमिनीचा स्पर्श होऊ न देण्याची खबरदारी घेत उभी असलेली बिल्डिंग !

मी क्षणभर घुटमळलो. जीव मुठीत धरून लिफ्टकडे निघालो.

पॉश हॉटेलातल्या वेटरसारखा दिसणारा लिफ्टमन बाहेर स्टुलावर पेंगत होता. 'त्याला उठवावं का ?' ह्याचा विचार करत थोडा वेळ घुटमळलो. त्या भाराने दबल्यासारखा शेवटी जीभ रेटत म्हणालोच–

'कमल राजहंस ! अठरावा मजला –'

लिफ्टमननं डोळे उघडून माझ्याकडे पाहिलं. कपाळावर आठ्या ! मनगटावरच्या रिस्टवॉचकडे पाहून तो लिफ्टमध्ये शिरला अन् म्हणाला, 'गेट इन !'

मी अंग चोरून आत शिरलो. पिशवी छातीशी धरली आणि एका कोपऱ्यात उभा राहिलो – लिफ्ट रिकामी असूनही.

लिफ्टचं दार खाडकन बंद झालं. ती वर वर जाऊ लागली. एक एक मजला खाली जाऊ लागला. तसा माझ्या पोटात खड्डा पडू लागला. पायात गोळे दाटून येऊ लागले. लिफ्ट थांबली तरी कोपरा सोडवेना. मी लिफ्टमनकडे पहावयास लागलो.

दरवाजा उघडून तो दरडावल्यासारखा म्हणाला, 'एटीन्थ फ्लोअर!'

कोपरा सोडून मी बाहेर आलो. पॉलिश केलेल्या चकचकीत दारासमोर उभा राहिलो. चकचकीत प्लेटवरील अक्षरे वाचली –

'कमल राजहंस – सेक्रेटरी टू–'

परत फिरण्याची एक जोरदार उबळ मनात उत्पन्न झाली. मी थरथरत्या

बोटानं कॉलबेलचं बटन दाबलं. आत अतिशय मंजुळ स्वर निनादले. त्यामागून त्याहून गोडसुरात कुणीतरी म्हणालं, ''येस कमिंग !''

मिडीतल्या एका तरुणीनं दार उघडलं अन् माझ्याकडे निरखून पाहात ती चौकटीतच क्षणभर उभी राहिली. मी गांगरून मनिलाच्या बटनाशी चाचपत म्हणालो, ''कमल राजहंस !''

'हो, या नं !' असं म्हणून ती चौकटीतून दूर झाली. आणि ती बाजूला होताच माझ्या डोळ्यासमोर एक अद्ययावत ड्रॉईंगरूम उभी राहिली. खालचं मॅटिंग इतकं मुलायम होतं की त्यावर पाऊल ठेवावं की नाही या संभ्रमात मी पडलो. चोरटेपणानं मी आपल्या चपलांकडे पाहिलं. पॉलिश उडालेल्या-मळकट!

चपला दाराशी काढत मी भितभितच मॅटिंगवर पाय ठेवला. डोळ्याच्या कोपऱ्यातून त्या तरुणीकडे पाहिलं. ती कोचाकडे हात दाखवत म्हणाली -

''बी सीटेड ! मी बोलावतेच ममाला.''

शरीराला एक मोहक हेलकावा देत ती आतल्या खोलीत अदृश्य झाली.

एकदम ट्यूब पेटली, 'ही शिल्पा ! केवढी मोठी झालीय ! एवढंस पाहिलं होतं हिला-आठ वर्षांपूर्वी.'

सोफा कम बेडवर बसत असताना मनात विचार आला, 'किती फरक झालाय शिल्पेत ! एकदम ओळखू सुद्धा आली नाही. लहान होती तेव्हा !'

ड्रॉईंगरूम एखाद्या हिंदी सिनेमातल्या लक्षाधीशांच्या ड्रॉईंगरूमसारखं सजवलेलं होतं. त्याचं निरिक्षण चालू असतानाच कमल बाहेर आली-

''केव्हा आलास अजू !'' तिनं विचारलं.

''आत्ताच !''

मी पाहिलं, कमलमध्ये इतक्या वर्षात काहीच फरक पडला नव्हता. पोशाख सोडून ! मीनाकुमारी सारखा तिचा चेहरा अन् बांधा जसा तिशीत होता तसाच आजही दिसत होता. अगदी बारकाईनं पाहिलं तेव्हा वाटली थोडी अगदी थोडी अंगात भरलेली !

डोळ्याखालच्या सुरकुत्या प्रसाधनाने लपवलेल्या एकदम दिसून येत नव्हत्या.

''खूपच फरक पडलाय तुझ्यात. केस कित्ती पांढरे झालेत. माझ्यापेक्षा वयानं लहान तू. पण खूपच वयस्क दिसायला लागलास आणि रोड सुद्धा !''

मी हसण्याचा प्रयत्न केला–लाजल्यासारखा ! अडखळत म्हणालो.

''बऱ्याच वर्षानं मुंबईला आलो. म्हटलं भेटून जावं ! आईनं वारंवार बजावलं. विसरू नको म्हणाली.''

''मामींची तब्येत ठीक आहे ना, समोरच्या दिवाणावर नाजूकपणे बसत तिने विचारलं, ''दमा कसा आहे तिचा ?''

आवाजात खूप प्रेमळपणा आणत ती हे विचारीत आहे असं मला वाटलं. उगीचच, रुक्षपणानं म्हटलं –

''पाचवीला पुजलाय तो ! तो आता गेल्यावरच बरा व्हायचा !''

''ओ गॉड ! कसं बोलवतं अजू तुला आपल्या आईबद्दल !'' कमल शॉक बसल्यासारखी उद्गारली. गुळगुळीत फ्लोअरींगवर ओरखडा काढल्यासारखं माझं बोलणं तिला वाटलं असावं. स्वरात जिव्हाळा आणून तिनं विचारपूस सुरू केली.

औषध चालू आहे का ? एखाद्या एक्स्पर्टला दाखवलं का ? थारो चेक केलं का ? बॉम्बेला का नाही आणलं ? एखाद्या स्पेशालिस्टला का नाही दाखवलंस ? वगैरे. मला वाटलं ही रेकॉर्ड कुणाबद्दलही अशीच वाजत असावी. अनेकांबद्दल !.... मी विषय बदलण्यासाठी म्हणालो.

''आईने लाडू पाठवलेत तुला द्यायला !''

पिशवीतला पितळेचा डबा हातात घेत उघडून पाहात कमल उद्गारली, ''अय्या ! बेसनाचे लाडू ! मामीला अजून आठवण आहे हं मला बेसनाचे लाडू खूप आवडतात म्हणून –''

जिव्हाळा काढून तिनं आता गळ्यात कौतुक भरलं. पण लगेच निराशेचा सूर लावत ती म्हणाली,

''पण खाता येत नाही रे मला ! डाएटवर आहे मी ! डायबेटीस ! बी.पी मेन्टेन करावं लागतं.''

''बी.पी. ?'' माझ्या आवाजात कुतुहल.

''येस ! म्हणजे आता तुमच्या मराठीत काय म्हणतात बरं त्याला...''

''रक्तदाब''

''करेक्ट–करेक्ट. तू एक लेखक आहेस मराठीतला.... विसरलेच होती मी ! वाचली होती मी तुझी एक गोष्ट – कोणती बरं ?''

मला नक्की माहीत होतं. तिनं माझी कोणतीच कथा वाचली नव्हती.

फेमिना किंवा फिल्मफेअर शिवाय ती काहीच वाचत नसणार. पण कुठून तरी केव्हातरी तिला कळलं असावं माझं लेखकपण ! मी म्हणालो,

"त्याचं काय एवढं ? जाऊ दे !"

तिला सुटल्यासारखं वाटलं असावं. तरीपण ती मान हालवत म्हणाली – "वा वा! असं कसं ?"

मग तिनं घरची सारी चौकशी केली. मामा, मामी, भावंड, बायको, मुलं, माझी नोकरी, पगार इत्यादी.

माझ्या पगाराचा आकडा ऐकताच तिने डोळे विस्फारले, "एवढ्यात कसं भागतं रे तुमचं ?"

तिचं हे आश्चर्य मात्र अस्सल वाटलं.

मी हसून म्हणालो, "चाललयं ! चारचौघांसारखं"

"नाही पण लहानपणापासून तू अगदी ब्रिलियंट ! मेरीट स्टुडंट तू ! आय रिमेंबर, यू केम फर्स्ट इन एम.ए. ! आम्हाला वाटलं होतं तू खूप मोठा होशील. एवन लाइफ लीड करशील – नांव कमावशील."

"लेखक झालोय मोठा.... खुर्चीचं काय मोठं !"

"असं कसं – माझा मुलगा माहीत आहे ना तुला, विराग ! नुसता सेकंडक्लासमध्ये बी.ए. पण जमवलं त्यानं टाटामध्ये. एअरकंडिशन फ्लॅट मिळालाय त्याला सांताक्रुझला. कंपनीची कार असते दिमतीला. स्मार्ट गाय !"

"म्हणजे इथं राहात नाही तो ?" मला आश्चर्य वाटलं.

"लग्न झालयं त्याचं. मग झाला वेगळा. एवढासा फ्लॅट कसा पुरणार आम्हाला पाचजणांना !"

माझ्या डोळ्यासमोर माझी तीन खोल्यांची जागा आठवली अन् त्यात राहणारे आम्ही सात माणसं !

"बरोबर आहे !" मी कृत्रिमपणे म्हणालो असेन.

कमल एकदम समाधान पावली. म्हणाली –

"काय घेतोस ? एनिथिंग कोल्ड ?"

आता ती उठून फ्रिजकडे जाऊ लागणार इतक्यात मी म्हणालो, "नको ! चहाच दे आपला"

"चहा !" चहा मागणारा हा कोण विचित्र प्राणी अशा तऱ्हेनं कमलनं पाहिलं.

"हो अन् तो सुद्धा कडक घेतो. तुम्ही घेता तसा मिळमिळीत नको. डिकॉक्शन पद्धतीने केलेला – अगोड"

"ओ:! यू नॉटी मॅन !" असं कौतुकानं म्हणून तिनं शिल्पाला हाक मारली.

"व्हाट ममा ?" म्हणत शिल्पा आत आली. तिनं आता मेकअप केलेला होता. कोरलेल्या भुवया, चेहऱ्यावर पावडरचा हलकासा थर, ओठावर लिपस्टिक, बॉब केलेले केस, व्ही कटचं बिनाबाह्याचं ब्लाऊज अन् ओटीपोटाखाली फिट नेसलेली साडी.

"अग ओळखलं का कोण आलय ते ? युवर अंकल !"

शिल्पानं माझ्याकडे पाहिलं. एखाद्या आदिवासीकडे पहावं तसं.

मी अस्वस्थ होऊन म्हणालो,

"लहान होती तेव्हा. आठ वर्षांपूर्वी !.... नसेल ओळखलं."

"चल चल असं कुठं चालतयं. काटोलला असतो हा माझा मामेभाऊ – अजय सहस्त्रबुद्धे ! जरा चहा करायला सांग काकूंना कडक !"

"कडक!" विंचू चावल्यासारखी शिल्पा नाजुकपणे किंचाळली आणि मघासारखीच माझ्याकडे पाहू लागली.

"हो !" मला उगीचच अपराध्यासारखे वाटू लागलं. "नसला तरी चालेल."

"वा, वा. असं कसं !"

असं म्हणत कमलच आत गेली. काकूंना चहाचं सांगायला.

शिल्पाचं माझ्याकडे टक लावून पाहणं चालूच होतं. एका तरूण मुलीचं असं धीटपणे टकटकीत पाहणं मला अस्वस्थ करू लागलं. तिची नजर टाळत मी काहीतरी विचारायचं म्हणून विचारलं,

"कुठं बाहेर निघाला वाटतं ?"

"अय्या, ग्रेटच आहात की ! मला अहो आहो म्हणताय." अन् ती चक्क खिदळू लागली. पोट धरून समोरच्या दिवाणावर बसली.

मी शरमलो. भिजल्या कुत्र्यासारखी माझी अवस्था झाली. काहीतरी बोलण्यासाठी मी तोंड उघडणार इतक्यात कमल बाहेर आली अन् शिल्पाला तसं खिदळताना पाहून तिनं दरडावल्यासारखं केलं. कृतककोपानं ! नंतर मला म्हणाली,

''अशीच आहे ही ! काही सिरियसली घेतच नाही मनावर''....

''नुसतं फ्लर्टींग !'' नंतर शिल्पाजवळ जाऊन म्हणाली, ''अग ! मामीनी लाडू पाठवले आहेत – बेसनाचे. बघतरी.''

''लाडू ? इऽऽ !'' शिल्पा अंगावर झुरळ उडून आल्यासारखी किंचाळली.

''गोड आवडत नाही तिला लहानपणापासून !'' कमलने स्पष्टीकरण केलं आणि ती कौतुकानं शिल्पाकडे पाहू लागली.

आईनं एवढ्या मायेनं पाठवलेल्या लाडवांकडे एकवार दयार्द्र नजरेनं पाहात मी पुटपुटलो.

''राहु देत घरात. येईल उपयोगी केव्हातरी कुणाच्या तरी.''

चहा घेऊन बाहेर आलेल्या काकूंकडे कमलनं तो डबा सोपवला अन् मला म्हणाली.

''चहा घे !''

मी चहाचा कप तोंडाला लावला.

शिल्पा एकदम आठवल्यासारखं म्हणाली, ''ममा ! आय ॲम गोईंग!''

''कुठं ग !''

''अग ! चंचलानीकडे पार्टी नाही का आज ?''

''हो ! खरचं. विसरलेच होते मी. तुला नि साहेबांना बोलावलंय नाही का त्यानं ?''

आणि त्यावरून त्या दोघींच्या बऱ्याच वेळ गोष्टी चालू राहिल्या. चंचलानी, साहेब, कोणीएक सुरेश नावाचा साहेबांचा पी.ए. त्याचं लफडे, पार्टीला येणाऱ्या निरनिराळ्या प्रतिष्ठित व्यक्तींची कुलंगडी, कसल्यातरी एका मोठ्या ऑफर इत्यादींबद्दल त्या दोघी बोलत राहिल्या. एकमेकींशीच !

माझं तिथलं अस्तित्त्वच त्या विसरल्या. माझं चहापान आटोपून गेल्यावरही बराच वेळ मी नुसता बसून होतो. त्या दोघींचं केव्हा तरी माझ्याकडे लक्ष जाईल अन् आपण त्यांचा निरोप घेऊ यासाठी –

पण त्यांचं माझ्याकडे लक्षच नव्हतं. जणू काही मी तिथं नव्हतोच. किंवा तिथं असलेल्या रेडिओग्रॅम, फ्रिज वगैरेसारख्या शोभिवंत चीजासारखा मीही एक होतो.

मला आता तिथं बसणंही असह्य होऊन गेलं. एखाद्या परदेशात येऊन

पडलेल्या माणसासारखं ! मी खाकरलो – लक्ष वेधण्यासाठी.

दोघींनीही दचकून माझ्याकडे पाहिलं. कमल ओशाळवाणं हसत म्हणाली –

"अरे ! तू आहेस इथं हे विसरलेच मी ! सॉरी !"

"निघतो मी आता" – मी म्हणालो.

"बरं ! येत जा अधूनमधून बॉम्बेला आला की ! नातेसंबंध टिकून राहतात येण्याजाण्यानं" – कमल कापऱ्या सुरात म्हणाली.

मी नुसता हुंकार भरला. काकूंनी परत केलेला डबा घेऊन दरवाजाकडे निघालो. पायात चपला घालता घालता औपचारिकपणे म्हणालो. "काटोलला एखादे वेळी या आमच्याकडे जमेल तेव्हा. कमलाकरांनाही सांग येऊन गेलो म्हणून !"

"हो होय ! जरूर" कमल तत्परतेनं म्हणाली. पण मला माहीत होतं, ती कधीच येणार नसते म्हणून !

कमलच्या सूचनेवरून शिल्पानं मला वाकून नमस्कार केला. तो उपचार मला एकदम खूप विसंगत वाटला. आंग्ल युवतीनं नऊवारी नेसून डोक्यावर पदर घ्यावा तसा –

लिफ्टमधून खाली उतरताना माझ्या मनावरचं दडपण एक एक मजल्यानंकमी होऊ लागलं. आणि मी जमिनीवर पाय ठेवताच माझा गुदमरलेला श्वास मोकळा झाला. मोकळ्या हवेत खुल्या मनानं श्वास घेत मी सहज मागे पाहिलं.

संध्याकाळचे सहा वाजल्यानं तळमजल्यावरची पोकळी मोटारीनं भरून गेली होती. मला वाटलं, मोटारींच्या चाकांवर ते वीस मजले तोलून उभे होते दिमाखानं !..... जमिनीपासून अलग !